दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

सत्य स्वतःसाठी, प्रेम इतरांसाठी व दया सर्वांसाठी हा समाधानी आयुष्याचा कानमंत्र आहे.

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 83 | मंगळवार , 16 जून 2026 | पाने 05 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com

# २ महिन्यांत ४४ अन्न नमुने; जिल्ह्यातील ४ हजार अहवाल प्रयोगशाळेत प्रलंबित

## कारवाया जोरात, पण अहवाल मिळेना ; अन्न भेसळ रोखण्याच्या मोहिमेला प्रयोगशाळेतील विलंबाचा फटका

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव - अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर राज्यभर अन्न भेसळीविरोधात विशेष मोहीम राबविली जात आहे. धाराशिव जिल्ह्यातही गेल्या दोन महिन्यांत तब्बल ४४ अन्न नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. मात्र छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत सुमारे ४ हजार नमुने प्रलंबित असल्याने एकाही नमुन्याचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे भेसळविरोधी कारवायांचा प्रत्यक्ष परिणाम कितपत होणार, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी कारभार हातात घेतल्यानंतर महाराष्ट्रभर अन्न भेसळीच्या विरोधात जोरदार मोहीम हाती घेण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा विभागाच्या पथकांकडून धडक कारवाया सुरू असून धाराशिव जिल्ह्यातही या मोहिमेची तीव्रता वाढली आहे. मात्र, घेतलेल्या नमुन्यांचे अहवाल वेळेत उपलब्ध होत नसल्याने या कारवायांच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाने १५ एप्रिल ते १५ जून या दोन महिन्यांच्या कालावधीत तब्बल ४४ वेगवेगळे अन्न नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. या नमुन्यांमध्ये दूध, खवा, लस्सी, दही, खाद्यतेल, आईस्क्रीम, कोल्ड्रिंक्स, आंबे तसेच इतर खाद्यपदार्थांचा समावेश आहे. विभागाकडून हे सर्व नमुने तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. मात्र अद्याप एकाही नमुन्याचा अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही. धाराशिव जिल्ह्यात मागील अनेक वर्षांपासून अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे रिक्त होती. त्यामुळे अन्न भेसळीविरोधातील कारवायांवर मर्यादा येत होत्या. तीन महिन्यांपूर्वी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची तीनही पदे भरली गेली. त्यानंतर विभागाच्या कामकाजाला गती मिळाली. तुकाराम मुंढे यांच्या नियुक्तीनंतर राज्यस्तरावर विशेष मोहीम सुरू झाली आणि धाराशिव जिल्ह्यातही चार-चार तालुक्यांसाठी स्वतंत्र दोन पथके तयार करून तपासणी मोहिमेला वेग देण्यात आला. मात्र, कारवायांचा वेग वाढला असला तरी प्रयोगशाळेतील प्रचंड कामाच्या ताणामुळे अहवाल मिळण्यात मोठा विलंब होत आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे नमुने तपासण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे एकच प्रयोगशाळा कार्यरत आहे. त्यातच मागील काही महिन्यांपासून अमरावती विभागातील नमुन्यांची तपासणी देखील याच प्रयोगशाळेत केली जात असल्याने कामाचा ताण आणखी वाढला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार प्रयोगशाळेत सध्या सुमारे ४ हजार नमुने तपासणीसाठी प्रलंबित आहेत.




### सर्व जिल्ह्यांतून वाढली नमुन्यांची संख्या

अन्न भेसळ रोखण्यासाठी राज्यभर सुरू असलेल्या विशेष मोहिमेमुळे सर्व जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणावर नमुने गोळा केले जात आहेत. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून दररोज सरासरी २० ते २५ नमुने प्रयोगशाळेत पाठवले जातात. त्याचबरोबर अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमधूनही मोठ्या संख्येने नमुने येत असल्याने तपासणी प्रक्रियेला विलंब होत आहे. परिणामी अनेक नमुन्यांचे अहवाल दोन ते तीन महिने मिळत नसल्याचे चित्र आहे.

### जिल्हा पातळीवर प्रयोगशाळांची गरज

सध्या अन्न व औषध प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात कारवाया होत असल्या तरी तपासणी यंत्रणेतील मर्यादा स्पष्टपणे दिसून येत आहेत. जिल्हा किंवा किमान विभागीय स्तरावर अधिक प्रयोगशाळा उभारण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. आधुनिक तंत्रज्ञानयुक्त प्रयोगशाळा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि जलद अहवाल प्रणाली उपलब्ध झाल्यास अन्न भेसळ करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे शक्य होईल. अन्यथा केवळ नमुने घेण्याच्या आणि कारवायांच्या आकडेवारीत वाढ होईल; मात्र नागरिकांना सुरक्षित अन्न उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही.

### १५ एप्रिलचे नमुनेही अद्याप प्रलंबित

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने १५ एप्रिल रोजी धाराशिव शहरातील विविध ठिकाणांहून आईस्क्रीम, कोल्ड्रिंक्स आणि आंब्याचे नमुने घेतले होते. हे नमुने त्याच दिवशी तपासणीसाठी पाठविण्यात आले. मात्र दोन महिने उलटून गेले तरी त्यांचे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. विशेष म्हणजे आंब्याचा हंगाम संपत आला असतानाही तपासणीचा निष्कर्ष समोर न आल्याने भेसळ करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई कशी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### बिर्याणी हाऊसबाबत गैरसमज

रविवारी धाराशिव शहरातील एका प्रसिद्ध बिर्याणी हाऊसमधून अन्न व औषध प्रशासनाने नमुने घेतल्याची चर्चा सोशल मीडियावर आणि काही माध्यमांमध्ये झाली होती. मात्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत स्पष्टीकरण देताना संबंधित ठिकाणी केवळ स्वच्छतेची पाहणी करण्यात आली असून कोणतेही नमुने घेण्यात आले नसल्याचे सांगितले.

### कारवाईनंतर तातडीने अहवाल आवश्यक

भेसळयुक्त अन्नपदार्थांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याने तपासणी अहवाल वेळेत उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. नमुन्यांमध्ये भेसळ आढळल्यास संबंधित विक्रेते, उत्पादक किंवा वितरकांवर कारवाई करता येते. मात्र अहवाल मिळण्यास दोन ते तीन महिने लागत असल्याने संबंधित मालाची विक्री सुरूच राहण्याची शक्यता असते. त्यामुळे भेसळ रोखण्याच्या उद्दिष्टालाच धक्का बसत आहे.

## बेकरी गोडाऊनमधून दोन किशोरवयीन कामगारांची सुटका

आरंभ मराठी । धाराशिव

बाल व किशोरवयीन कामगारांना रोजगारापासून मुक्त करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष अभियानांतर्गत धाराशिव शहरातील एका बेकरी गोडाऊनवर करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत दोन किशोरवयीन कामगार आढळून आले. त्यांची सुटका करून त्यांना बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असून संबंधित मालकाविरुद्ध विविध कामगार कायद्यांतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा बाल कामगार कृतीदल समिती, नितीन पाटणकर, कामगार उपायुक्त यांच्या निर्देशानुसार आणि गोविंद गावंडे, सरकारी कामगार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ तसेच सुधारित अधिनियम, २०१६ अंतर्गत बालकामगार व किशोरवयीन कामगार मुक्त अभियान राबविण्यात आले. या अभियानादरम्यान धाराशिव शहरातील समर्थ नगर परिसरातील बेंगलोर बेकरी गोडाऊनची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी दोन किशोरवयीन कामगार काम करत असल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांना तातडीने बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. तसेच संबंधित मालकाविरुद्ध विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरा पारित करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## चिवरी पाटीजवळ गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांवर कारवाई

**नळदुर्ग :-** गोवंशीय जनावरांना क्रूरपणे कोंबून, चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक करणाऱ्या चौघांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महादेव इंद्रजीत कांबळे (वय ३४, रा. भंडारी, ता. धाराशिव), विशाल विकास बनसोडे (वय ३५, रा. वडगाव देव, ता. तुळजापूर), महादेव गोविंद धाकतोडे (वय ५०, रा. सारोळा, ता. तुळजापूर) व लखन हनुमंत मोटे (वय ३०, रा. काक्रंबा, ता. तुळजापूर) यांनी १४ जून रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास तुळजापूर-नळदुर्ग मार्गावरील चिवरी पाटी परिसरात विविध मालवाहतूक वाहनांमधून गोवंशीय जनावरांची वाहतूक केली.यामध्ये अशोक लेलँड कंपनीच्या एमएच१३ एएन९७५३ क्रमांकाच्या वाहनात ३ जर्सी गायी व ४ खोंडे, एमएच १३ सीयू ५१७९ क्रमांकाच्या पिकअपमध्ये १ जर्सी गाय व ५ कालवडी, एमएच २५ एजे २९०८ क्रमांकाच्या वाहनात ५ रेडे, १ वगार, ३ कालवडी व ३ खोंडे, तसेच एमएच २४ एयू ३५९६ क्रमांकाच्या वाहनात ३ जर्सी गायी अशा जनावरांची वाहतूक सुरू होती. पोलिसांनी कारवाई करत सुमारे ६ लाख ४ हजार रुपये किंमतीची गोवंशीय जनावरे व वाहने ताब्यात घेतली. या प्रकरणी संबंधित चौघांविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५(अ) व ९ अन्वये नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

## एकल महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी बीज महोत्सव

### ५५०० महिलांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप

आरंभ मराठी । कळंब

नाम फाउंडेशन प्रायोजित आणि पर्याय फाउंडेशन आयोजित बीज महोत्सवांतर्गत धाराशिव जिल्ह्यातील ५ हजार ५०० अल्पभूधारक व एकल महिला शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले. खरीप हंगामाच्या तोंडावर झालेल्या या उपक्रमामुळे महिला शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महाराष्ट्र लोकविकास मंचाचे विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांनी ग्रामीण भागातील अल्पभूधारक व एकल महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. नाम फाउंडेशन आणि पर्याय फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू कुटुंबांच्या पाठीशी सातत्याने उभे राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी नाम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात यांनी संस्थेच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत शेतकरी, शेतमजूर आणि गरजू कुटुंबांसाठी सुरू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डक यांनी यंदा समाधानकारक पावसाची शक्यता व्यक्त करत शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून खरीप हंगामाची तयारी करावी, असे आवाहन केले. तर धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष महेश पोतदार यांनी ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी होत असलेल्या कार्याचे कौतुक केले.कार्यक्रमास नाम फाउंडेशनचे समन्वयक राजाभाऊ शेळके, पर्याय फाउंडेशनचे ऋषिकेश तोडकर, विलास गोडगे, एकल महिला संघटनेच्या अध्यक्षा सुनंदा खराटे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.कळंब व वाशी तालुक्यातील महिला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




## १०० टक्के अनुदानावर सोयाबीन बियाण्यांचे वाटप; पळसपमधील ५० शेतकऱ्यांना लाभ

आरंभ मराठी । पळसप

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंतर्गत पळसप येथे १०० टक्के अनुदानावर सोयाबीन बियाणे किटचे वाटप करण्यात आले. या योजनेसाठी काही दिवसांपूर्वी कृषी विभागाने ऑनलाइन अर्ज मागविले होते. ही योजना वैयक्तिक शेतकरी तसेच शेतकरी बचत गटांसाठी राबविण्यात आली होती. ड्रॉ पद्धतीने निवड झालेल्या लाभार्थी शेतकरी गटांना कृषी सहाय्यक सचिन मगर यांच्या हस्ते सोयाबीन बियाण्यांचे वितरण करण्यात आले. यामध्ये पळसप येथील कृषीप्रधान शेतकरी बचत गट आणि कृषी संकल्प शेतकरी बचत गट या दोन गटांतील एकूण ५० सदस्यांना प्रत्येकी एक बॅग याप्रमाणे महाबीज कंपनीच्या ७२५ या वाणाच्या ५० बॅग सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी सहाय्यक सचिन मगर यांनी बदलत्या हवामानाचा तसेच एल निनोच्या संभाव्य प्रभावाचा विचार करून योग्य वेळी आणि पुरेशा ओलाव्यातच पेरणी करण्याचा सल्ला दिला. अधिक उत्पादनासाठी बीबीएफ (BBF) यंत्राद्वारे पेरणी करण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. तसेच पेरणीपूर्वी बियाण्यांची प्रक्रिया करणे अत्यावश्यक असून त्यामुळे पिकांचे संरक्षण व उत्पादनवाढीस मदत होते, असेही त्यांनी सांगितले.



आरंभ मराठी

## खाजगी सोनोग्राफी व एमटीपी केंद्रांची पाहणी

# पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय पथकाची धाराशिवमध्ये धडक तपासणी

आरंभ मराठी । धाराशिव

गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा तसेच वैद्यकीय गर्भपात अधिनियम यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नोंदणीकृत खाजगी सोनोग्राफी व एमटीपी केंद्राला अलीकडेच अचानक भेटी देत सखोल तपासणी मोहीम राबविली. गर्भलिंग निदानास प्रतिबंध घालणे, लिंग निवडीच्या बेकायदेशीर प्रकारांवर नियंत्रण ठेवणे आणि मुलींच्या जन्माचे प्रमाण संतुलित राखणे हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. राज्य पर्यवेक्षीय मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक २७ मे २०२६ रोजी आरोग्य भवन, आरोग्य सेवा आयुक्तालय येथे पार पडली होती. या बैठकीत आरोग्य मंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील नोंदणीकृत केंद्रांची अचानक तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित केंद्रांमधील रुग्ण नोंदवही, ऑनलाईन एफ-फॉर्म, केंद्रांचे नोंदणी प्रमाणपत्र, रेफरल स्लिप, आवश्यक दर्शनी फलक, पीसीपीएनडीटी कायद्याची पुस्तिका, सोनोग्राफी मशीनची नोंद तसेच एमटीपीशी संबंधित विविध कागदपत्रांची बारकाईने पडताळणी करण्यात आली. यासोबतच केंद्रांच्या परवानगीविषयक बाबी आणि कायद्याचे काटेकोर पालन होत आहे का, याचीही तपासणी करण्यात आली. यावेळी राज्य कुटुंब कल्याण कार्यालय,पुणे येथील उपसंचालक (वि.ल.टो.) डॉ.दिगंबर कानगुले यांनी सांगितले की, पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून लिंग निवडीस प्रतिबंध करणे, गर्भलिंग निदानाच्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालणे आणि मुलींचे जन्म प्रमाण संतुलित राखणे हा अशा तपासण्यांचा मुख्य उद्देश आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राज्य व जिल्हास्तरावर नियमितपणे अचानक भेटी आणि तपासण्या आयोजित करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. या पाहणी मोहिमेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ.शिवाजी फुलारी, डॉ.विक्रांत राठोड, अमर सपकाळ तसेच संबंधित जिल्हास्तरीय अधिकारी सहभागी झाले होते. तपासणीदरम्यान संबंधित सोनोग्राफी व एमटीपी केंद्रांचे डॉक्टर आणि प्रतिनिधीही उपस्थित होते. जिल्ह्यातील कोणतेही नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्र पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करत असल्याची अथवा कोणीही अनधिकृतपणे गर्भलिंग निदान करत असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.



## चार गावठी पिस्टलसह दोन आरोपी जेरबंद; २.९४ लाखांचा मुद्देमाल जप्त




आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहर पोलिसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत दोन आरोपींना चार गावठी पिस्टल, तीन जिवंत काडतुसे व मोटारसायकलसह जेरबंद केले. या कारवाईत एकूण २ लाख ९४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार अवैध शस्त्रधारकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. त्याच अनुषंगाने १३ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना बेंबळी-धाराशिव मार्गावरील साळुंखे नगर कमानीजवळ गोपनीय माहिती प्राप्त झाली. माहितीनुसार, बालाजी बबन काळे (रा. कल्याणनगर, भूम, सध्या गोलेगाव पारधी पेडी) व आश्रु उर्फ भुऱ्या भिमा काळे (वय ३०, रा. जांब, ता. भूम) हे मोटारसायकल (एमएच-२५ एयू-९४३३) वरून बेंबळीच्या दिशेने जात असून त्यांच्याकडे गावठी पिस्टल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यानंतर पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत साळुंखे नगर कमानीजवळ सापळा रचला. रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संशयित मोटारसायकलवरून येताना दिसताच त्यांना थांबवून चौकशी करण्यात आली. अंगझडतीदरम्यान त्यांच्या ताब्यातून चार गावठी पिस्टल, तीन जिवंत काडतुसे आणि मोटारसायकल असा एकूण २.९४ लाख रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी सर्व साहित्य जप्त करून आरोपींना ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्याविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहायक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, पोहेकॉ समाधान वाघमारे, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, महिला पोहेकॉ शोभा बांगर, पोलीस नाईक अशोक ढगारे तसेच दहीहांडे, शेरखाने व मुंगळे आदींच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून



ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

## तुतारी-संबळाच्या निनादात नवागतांचे स्वागत

### न.प. प्रा. शा. क्र. २ मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ मध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे तुतारी व संबळाच्या निनादात जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच पालक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, त्यांच्या पायांचे ठसे घेऊन, पेढे व फुले देत स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ, भाजपाचे जिल्हा कोषाध्यक्ष नागेश नाईक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन झाडपिडे, केंद्रप्रमुख मोहन भोसले, गुलचंद व्यवहारे, प्रसाद पानपुडे, पालक प्रतिनिधी महादेव चोपदार तसेच सेवानिवृत्त शिक्षक बापू शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीतील सर्व नवागत विद्यार्थ्यांना नागेश नाईक यांच्या वतीने स्कूलबॅगसह शैक्षणिक साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसाठी विशेष सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी व पालकांनी सेल्फी काढत प्रवेशोत्सवाचा आनंद लुटला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक गणेश रोचकरी यांच्यासह सहशिक्षक महेंद्र पाटील, महेंद्र कावरे, बाळासाहेब जेटीथोर, सुरजमल शेटे, केरण लोहारे, सुज्ञानी गिराम, विद्यादेवी स्वामी आणि शिवा डाके यांनी परिश्रम घेतले.

# अधिक मासातील कुप्रथांचा त्याग करायला हवा

अधिक मासात जावयाला घरी बोलावून सन्मान करण्याची प्रथा ही महाराष्ट्रासह काही प्रदेशांतील लोकपरंपरा आहे. उपलब्ध धार्मिक ग्रंथांच्या आधारे पाहिले असता, स्कंद पुराण, पद्म पुराण, नारद पुराण किंवा भविष्योत्तर पुराण यांमध्ये अधिक मासाचे माहात्म्य, व्रत, दान, जप, उपवास आणि भगवान विष्णू (पुरुषोत्तम) यांची उपासना यांचा उल्लेख आढळतो; परंतु अधिक मासात जावयाचा सन्मान करावा किंवा 'जावयाचे वाण' द्यावे, असा स्पष्ट उल्लेख पुराणांमध्ये आढळत नाही.अधिक मासाशी संबंधित पुराणांमध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टींवर भर दिला आहे.भगवान विष्णू/पुरुषोत्तम यांची भक्ती.दान, जप, पारायण आणि सत्कर्म.गरजूंना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्मकरण्याचे सांगितले आहे.मग हा अट्टहास कशासाठी? संत, महात्मे, समाजसुधारक यांनी आपल्याला ह्याच रूढी परंपरेवर घाला घालण्यासाठी शिकवले.आपण ते पुस्तकात वाचतोसुद्धा..!अहो! एवढेच काय, इयत्ता पाहिलेपासून आपल्याला पाठ्यपुस्तकातून शिकवल्या जाते. शालांत परीक्षेत प्रश्नही विचारले जातात.एवढं सर्व आकलन करुन परीक्षा देऊन,या बुरसट चालीरितींना खत पाणी घालण्यास सुशिक्षित वर्ग सध्या अग्रेसर आहे.खोट्या प्रतिष्टेसाठी,मान सन्मानासाठी मेंढीवळणासारखं हजारो लाखो रुपयांचा चुराडा होतोय, कितीतरी मुलींचे बापमाणूस वडील कर्जबाजारी होतं आहे.आपण एकीकडे बघतो नेमकं हा महिना पावसाळ्याच्या तोंडी येतो,पेरणी पूर्व मशागतीची वेळ असते.शेतकरी वर्गाला नांगरणी वखरणी तथा बी-बियाणे खरेदि करण्यासाठी पैशाची निकड भासत असते तर दुसऱ्या बाजूला या लोकरूढी कीं ज्याना कुठेही शाश्त्राचा आधार नाही त्यावर होणारा खर्च यामुळे तो बिच्चारा आर्थिक विवंचनेत सापडतो. कर्जबाजारी होऊन त्याच्यावर आत्महत्येची पाळी येते. सध्या समाजातील एक विकृती प्रकर्षाने येथे उल्लेखित करावाशी वाटते. 'स्टेटस' आम्ही अधिक मासात जावयासाठी केलेलं जावई दान किंवा वाण हे स्टेटस ठेवून नेमकं काय सिद्ध करायचं? हा बडेजाव कश्यासाठी?एकमेकांना दाखण्यासाठी...!मित्रांनो,आपण धार्मिक ग्रंथाना, वेद, पुरानांना परमात्म्याचे वाङ:मयीन रूप मानतो. मग पुराणानुसार या मासात भगवान विष्णुची आराधना कोणी केली,दान, जप, पारायण सत्कर्म तथा गरजूंना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्म कोणी केले? नाही ना...! अर्थात आपण धर्माची मूळ शिकवण उपदेश बाजूला ठेवून भरकत



चाललोय.काळ बदलत चालला आहे.धर्मावर होणारे अन्याय-आत्याचार थांबत नाहीये. माणूस म्हणून माणसासोबत वागायला तयार नाही.एकवेळी अशिक्षित समाजाने या गोष्टी केल्या तर आपण म्हणूयात कीं, त्यांनी मागील पिढीने जसं सांगितलं तसं वर्षानुवर्षं केलं .हो मान्य आहे, त्यांनी केलंही यात शंका नाही. तो काळ वेगळा होता. दळवळणाची साधने नव्हती.लेकीच्या लग्नानंतर वर्ष-वर्षभर बाप-लेक, माय-लेक बहीण- भाऊ एकमेकांना भेटत नव्हते, म्हणून या अधिक मासाच्या निमित्ताने नातेसंबंध दृढहोण्यास मदत व्हायची.मात्र हल्ली, सर्व सुविधा उपलब्ध आहेत.दळवळणाची साधने, भ्रमनध्वनीच्या माध्यमातून वार्तालाप तथा व्हिडिओ कॉल वगैरे ह्या सर्व घडामोडी आहेतच.यातून सर्व जग जवळ आले मात्र एकमेकांप्रति आपुलकी कुठे? मग ह्या चालीरिती,या बुरसट रूढी परंपरा यांना खत पाणी कश्यासाठी? केवळ दिखावा म्हणून कीं मुलींच्या आई वडीलांचं दिवाळं काढण्यासाठी? म्हणून तरुण सुशिक्षित मित्र मंडीळींनो तुम्हि या गोष्टी टाळा.इतरांना सांगा. या अधिक मासाचे खरं महत्व समाजाला पटवून द्या.या मासाचा मूळ उपदेश तथा शिकवण जशी कीं, ईश-भक्ती करा. गोर-गरीब,गरजू मुलांना शालेय वस्तूंची भेट द्या. गरजवतांना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्म करा.व येणाऱ्या पिढीसाठी एक आदर्श उभा करा. जर ही प्रथा केवळ एक प्रेमभेट , स्नेह आणि स्वेच्छेने जावयाचा व मुलीचा सन्मान करण्यापुरती मर्यादित असेल तो एक 'भावनिक बंध' ठरेल, परंतु जर त्यातून आर्थिक भार, हुंड्यासारखी अपेक्षा, सक्ती, दिखाऊपणा किंवा मुलीच्या माहेरच्या कुटुंबावर अनावश्यक दबाव निर्माण होत असेल, तर अशा स्वरूपातील प्रथा कुप्रथा ठरेल,म्हणून अश्या या अधिक मासातील जावयाचा सन्मान व वाण अश्या या कु-प्रथांचा त्याग करा कीं, ज्यांचा पुराणात कुठेही उल्लेख नाही.

विनोद शेनफड जाधव
मासरूळ, ता. जि - बुलडाणा
मो नं 9763282077

# झेडपी अध्यक्षा, सीईओ, शिक्षणाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

## कनगरा झेडपी शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात





आरंभ मराठी । धाराशिव

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त जिल्हास्तरीय शाळा प्रवेशोत्सव उपक्रमांतर्गत कनगरा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे सजवलेल्या बैलगाडीतून प्रभातफेरी काढून स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावर रंगीत पाऊलखुणांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचे स्वागत करण्यात आले, तर मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, फुले आणि मिठाई वाटप करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा म्हाडदळकर, जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. रविंद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी प्रकाश पारवे, जिल्हा परिषद सदस्य दयानंद शिंदे, शिक्षण विस्ताराधिकारी जयमला शिंदे, केंद्रप्रमुख संजय तानवडे, सरपंच विठ्ठल सुरवसे, उपसरपंच सुरज इंगळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजय गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी प्रकाश पारवे यांनी महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचा संदेश वाचून दाखविला. जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. रविंद्र खंदारे यांनी शासनाच्या विद्यार्थीहिताच्या विविध योजनांची माहिती दिली, तर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी विद्यार्थ्यांनी लहानपणापासून मोठी ध्येये ठेवून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांनी सेमी इंग्रजी वर्ग, अत्याधुनिक अभ्यासिका, संस्कारगीत उपक्रम, अभ्यासाचा भोंगा, शाळांच्या भौतिक सुविधांसाठी निधी, स्वतंत्र स्वच्छतागृहे आणि क्रीडा विकासासाठी आवश्यक मदत देण्याची ग्वाही दिली. ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत करत समाधान व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक काकासाहेब माने व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन केंद्रप्रमुख भालचंद्र कोकाटे यांनी केले, तर नितीन इंगळे यांनी आभार मानले.

## तुळजापूर शहरातील सीसीटीव्ही प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरात सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या सीसीटीव्ही कॅमेरा प्रकल्पाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून या संपूर्ण कामाची सखोल व उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते जयकुमार नागनाथ पांढरे यांनी केली आहे. तुळजापूर शहरासाठी मंजूर असलेल्या सुमारे 9.99 कोटींच्या सीसीटीव्ही प्रकल्पापैकी



जवळपास 6 कोटींचा निधी वितरित झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पात बसविण्यात येणारे सीसीटीव्ही कॅमेरे STQC मान्यताप्राप्त आहेत का, त्यांची थर्ड पार्टी तपासणी करण्यात आली आहे का, तसेच गुणवत्ता निरीक्षण झाले आहे का, याबाबत नागरिकांमध्ये शंका व्यक्त होत आहेत. शहरात बसविण्यात येणारे कॅमेरे चिनी कंपनीचे असल्याची चर्चा सुरू असून त्याबाबतही प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तुळजापूर हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व पर्यटन स्थळ असून येथे दरवर्षी लाखो भाविक भेट देतात. तसेच शहरात विविध गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर सक्षम आणि उच्च दर्जाची सीसीटीव्ही यंत्रणा अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
»पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# अतिवृष्टीला ९ महिने उलटले, तरी बंधारे-पूल दुरुस्तीची प्रतीक्षा कायम

## नुकसानभरपाईचा पत्ताच नाही, दुरुस्तीही रखडली; परंडा तालुक्यातील नागरिकांचा प्रशासनावर सवाल

अर्जुन गोडगे । आरंभ मराठी

**परंडा - परंडा तालुक्यात मागील वर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीला जवळपास नऊ महिने उलटून गेले आहेत. मात्र अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तलाव, बंधारे, पूल आणि शेतजमिनींच्या दुरुस्तीबाबत अद्यापही ठोस हालचाली झालेल्या नसल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रखडलेल्या कामांमुळे पुन्हा एकदा संकट ओढवण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील शेती, नदी-नाले, बाजार तलाव, सिंचन तलाव तसेच अनेक बंधाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अनेक ठिकाणी बंधाऱ्यांचे दरवाजे वाहून गेले, तर काही ठिकाणी भराव खचल्याने पाणी साठवणुकीची क्षमता कमी झाली आहे. परिणामी रब्बी हंगामात शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध झाले नाही. त्यामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागला. यंदाच्या पावसाळ्याला सुरुवात होऊन आठ दिवस उलटले असतानाही अनेक नुकसानग्रस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती सुरू झालेली नाही. वेळेत कामे पूर्ण न झाल्यास आगामी काळात अतिवृष्टी झाल्यास पुन्हा बंधारे फुटण्याची व पाणी साठवणुकीची व्यवस्था कोलमडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असला तरी निधी मंजुरीअभावी कामे रखडल्याचे सांगण्यात येत आहे.

### पुलाची तत्काळ दुरुस्ती करावी

भूम-वारदवाडी मार्गावरील वाकडी येथील चांदणी नदीवरील पूल धोकादायक स्थितीत आहे. अनेक वेळा प्रशासनाचे लक्ष वेधले, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. पुलाची तातडीने दुरुस्ती करावी.

**गजानन पाटील,**
**सामाजिक कार्यकर्ते.**

### खरडून गेलेल्या जमिनींचा मोबदला अद्याप प्रलंबित

अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी खरडून गेल्या होत्या. चांदणी, सीना आणि उल्का नद्यांच्या काठावरील शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले होते. शासनाकडून मदतीची घोषणा करण्यात आली होती. मात्र नऊ महिने उलटूनही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतः कर्ज काढून किंवा पदरमोड करून जमिनीवर गाळ टाकण्याचे काम केले आहे.

### वाकडी येथील चांदणी नदीवरील पूल धोकादायक

भूम-वारदवाडी मार्गावरील वाकडी येथील चांदणी नदीवरील पूल अतिवृष्टीनंतर धोकादायक स्थितीत आला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंचे कडे वाहून गेले असून वाहतुकीसाठी धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे या मार्गावरून राज्यातील अनेक वरिष्ठ नेते आणि मंत्री प्रवास करून गेले, तरीही पुलाच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष झाल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे.

### नदीकाठच्या गावांना फटका

पाचपिंपळा, वाकडी, सिरसाव, राजुरी, भांडगाव, खासापुरी आदी गावांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला होता. अनेक ठिकाणी दळणवळण व्यवस्था विस्कळीत झाली होती. काही पूल अर्धवट तुटलेल्या अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती अद्याप झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

### विकासाच्या घोषणा आणि प्रत्यक्षात शून्य काम

गतवर्षीच्या नुकसानीनंतर ना शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळाली, ना बंधारे व पूल दुरुस्त झाले. त्यामुळे शासन केवळ विकासाच्या घोषणा करत असून प्रत्यक्षात कामे होत नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. सिरसाव येथे माझी एक एकर जमीन पूर्णपणे वाहून गेली. मोठे नुकसान झाले; मात्र शासनाकडून अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही. लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी.

**चंद्रजीत केवडकर,**
**शेतकरी, सिरसाव**

## विविध वृत्त

### खुदावाडी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**नवागतांचे स्वागत, मोफत गणवेश व पुस्तकांचे वाटप**



आरंभ मराठी । अणदूर

ग्रामस्वच्छता अभियानात उल्लेखनीय कामगिरी करून खुदावाडी गावाला पारितोषिक मिळवून देणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खुदावाडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात झाला. 'चला, नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहाने स्वागत करू या' या संकल्पनेवर आधारित शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसह गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. या फेरीद्वारे शिक्षणाचे महत्त्व आणि शाळेत प्रवेशाचे संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके हातात मिळताच विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी केंद्रप्रमुख दगडू सालेगाव यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांसाठी गोड पदार्थ म्हणून शिरा देण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेचा लेखापरीक्षण अहवाल नागरिकांसाठी उपलब्ध

**संकेतस्थळ व नोटीस बोर्डावर प्रसिद्ध**

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत सामान्य प्रशासन विभागामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील स्थानिक निधी लेखा परीक्षण विभागाने केलेल्या लेखापरीक्षणाचा अहवाल नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जिल्हा परिषद धाराशिवच्या कामकाजातील आर्थिक व्यवहार, प्रशासकीय प्रक्रिया तसेच लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींचा समावेश असलेला हा अहवाल जिल्हा परिषद धाराशिवच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.लेखापरीक्षण अहवालामध्ये स्थानिक निधी लेखा परीक्षण विभागाने नोंदविलेल्या निरीक्षणे,आक्षेप,त्रुटी अथवा इतर नमूद बाबींचा तपशील समाविष्ट असून,नागरिकांना हा अहवाल पाहता यावा आणि जिल्हा परिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती उपलब्ध व्हावी,या उद्देशाने तो सार्वजनिक करण्यात आला आहे.जिल्हा परिषद प्रशासनाने नागरिकांना संकेतस्थळावरील तसेच नोटीस बोर्डावरील अहवालाचा अभ्यास करून आवश्यक माहिती घेण्याचे आवाहन केले आहे.

### श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



आरंभ मराठी । धाराशिव

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी पालक व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. आपल्या पाल्याचा शैक्षणिक पाया या प्रशालेत भक्कम व सक्षम होणार असून पालकांनी निर्धास्त राहावे, असे ते म्हणाले. याच मजबूत पायावर विद्यार्थी भविष्यात यशाची शिखरे सर करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी उपमुख्याध्यापक यशवंत इंगळे, पर्यवेक्षक प्रवीण बागल, श्रीमती बी. बी. गुंड, कुमार निकम, बालाजी गोरे, राजेंद्र जाधव, शेषेनाथ वाघ, ग्रंथपाल रामदास फंड तसेच प्रशालेतील सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुलाब पुष्पांनी नवागतांचे स्वागत

**समता विद्यालयात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण**



आरंभ मराठी । धाराशिव

नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त धाराशिव शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील पारिजात बालवाडी, मराठी कन्या प्राथमिक शाळा व समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. समता सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. गजानन चौगुले व सचिव डॉ. उषा वडने यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. तसेच इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

## तहसीलदार म्हेत्रे यांची वाशी जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट

आरंभ मराठी । वाशी



जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, वाशी येथे सोमवारी वाशीचे तहसीलचे तहसीलदार म्हेत्रे यांनी सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिली व इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, शैक्षणिक पुस्तके व मिठाई देऊन उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. तहसीलदार म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यास, शिस्त आणि चांगले संस्कार याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी त्यांनी विविध मनोरंजक खेळ व उपक्रम घेतले. या खेळांमुळे विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमादरम्यान शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले. यामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली. या प्रसंगी केंद्रप्रमुख चौधरी सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हंसराज कवडे, मुख्याध्यापिका सविता भारत मोळवणे तसेच शिक्षक ज्ञानेश्वर नारायण जानगेवाड, सुनिता रमेश वाकडे आणि सविता श्रीधर महामुनी उपस्थित होते.

## पोहनेर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव व पालक मेळावा उत्साहात

आरंभ मराठी । धाराशिव



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोहनेर येथे सोमवारी (दि.१५) शाळा प्रवेशोत्सव व पालक मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले. यावेळी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ट्रॅक्टरमधून वाजत-गाजत प्रवेश दिंडी काढण्यात आली. गावातून काढण्यात आलेल्या या दिंडीमुळे उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व शालेय गणवेशांचे वितरण करण्यात आले. तसेच पालक मेळाव्याच्या माध्यमातून शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळेशी सातत्याने संपर्क ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास शाळा भेटीसाठी आलेल्या डॉ. भिसे मॅडम, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जय भवानी विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात; विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तके, मिठाई व पुष्प देऊन स्वागत

आरंभ मराठी । पारा

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी येथील जय भवानी विद्यालयात प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तके, मिठाई, पेन आणि पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे प्रेरणास्थान कै. शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच शिक्षणाचे महत्त्व, नियमित अध्ययनाची सवय आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ माळी, आम्ही पारेकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष विष्णूभाऊ हिंगणे, ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा येथील संचालक बारीकराव शेळके यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संदीप भराटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शितल मेटे, दीपक मुरकुटे, सतीश वाघमारे, विकास माळी, अमोल बांगर, दीपक मुळे, शहाजी सोलंकर, अमोल गवळी, तुषार डमरे, अतुल गवळी तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## महिलेच्या गळ्यातील १३ ग्रॅम सोन्याचे गंठन हिसकावले

**धाराशिव :-** शहरातील सांजा रोड परिसरात दुचाकीवरून जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन अज्ञात दोन चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी छाया सुनिल शेरखाने (वय ४४, रा. बापू शेखखाने गल्ली, सांजा रोड, धाराशिव) या १३ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास सांजा रोडवरील आर्यन फंक्शन हॉलसमोरील रस्त्यावरून दुचाकी (एमएच-२५ एव्हाय-०५४४) वरून जात होत्या. त्यावेळी अज्ञात दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे काळ्या मण्यांमध्ये असलेले सोन्याचे गंठन जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. याप्रकरणी छाया शेरखाने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

दैनिक आरंभ मराठी

## नगरपरिषद शाळा क्र. 18 मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

# काँग्रेस पक्षाकडून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

आरंभ मराठी । धाराशिव

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त धाराशिव शहरातील नगरपरिषद शाळा क्रमांक 18 येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडावे आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश इंद्रसिंह राजेनिंबाळकर यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमास उदयराजे निंबाळकर, प्रशांत पाटील, हरिदास शिंदे, मेहबूब पटेल, राजाभाऊ राऊत, प्रमोद चव्हाण, दत्तात्रय मुळे, विजय मुकडवार, विकास राऊत, सुरेश गायकवाड, अभिषेक बागल, मनसूर सय्यद, नसीर शेख आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक शंकर घंटे, हेसगळे, भोईटे सर, कुर्मदास माळी यांच्यासह शिक्षकवृंद, परिसरातील नागरिक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# हंगाम सुरू झाला तरी बियाण्यांची तपासणी नाही, कृषी विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

## बोगस बियाण्यांविरोधातील कारवाईत दिरंगाई; पेरणीनंतर अहवालाचा उपयोग काय ? शेतकऱ्यांचा संतप्त सवाल

जगदीश गवळी । आरंभ मराठी

**कळंब - कळंब तालुक्यात खरीप हंगामातील पेरण्यांना वेग आला असताना शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. कळंब तालुक्यात बोगस व निकृष्ट बी-बियाण्यांच्या तक्रारी वाढत असतानाही विक्री केंद्रांवरील बी-बियाणे व खतांचे नमुने वेळेत संकलित करून गुणवत्ता तपासणीसाठी पाठविण्याचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे 'पेरणी झाल्यानंतर अहवाल येणार असतील, तर अशा तपासणीचा उपयोग तरी कोणासाठी?' असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.**





### बोगस बियाण्यांचा फटका बसू नये याची काळजी घेण्याची मागणी

कळंब तालुक्यात सुमारे पावणेदोन लाख एकर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जाते. या पिकावर हजारो शेतकरी कुटुंबांचे अर्थकारण अवलंबून आहे. शिक्षण, आरोग्य आणि वर्षभराचे आर्थिक नियोजन या पिकाच्या उत्पन्नावर आधारित असल्याने बियाण्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडला गेला आहे. बाजारात अनेक बोगस कंपन्यांची बियाणे व खते खुलेआम विकली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. निकृष्ट किंवा बोगस बियाणे सिद्ध झाले तरी शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई मिळवून देणारी प्रभावी यंत्रणा नसल्याने त्यांना ग्राहक न्यायालये आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांचा आधार घ्यावा लागतो. दुष्काळ, वाढते उत्पादन खर्च आणि अनिश्चित बाजारभाव यामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना जर बोगस बी-बियाण्यांचा फटका बसला, तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि कृषी विभागाने तातडीने हस्तक्षेप करून नमुना संकलन व गुणवत्ता तपासणी मोहीम प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

एकीकडे खरीप हंगाम ऐन भरात आला असून शेतकरी मोठ्या प्रमाणात बी-बियाणे व खतांची खरेदी करत आहेत. मात्र बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांची गुणवत्ता तपासण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा अपेक्षित वेगाने काम करत नसल्याचा आरोप होत आहे. खतांचा तुटवडा जाणवत असतानाच उपलब्ध खतांच्या गुणवत्तेबाबतही शंका उपस्थित होत असल्याने शेतकरी अधिकच चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड यांनी प्रभारी तालुका कृषी अधिकारी तसेच तहसीलदार यांना निवेदन देऊन तातडीने बी-बियाणे व खतांचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबविण्याची आवश्यकता संघटनांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे तालुका कृषी कार्यालयात ३६ कृषी सहाय्यक, ६ कृषी पर्यवेक्षक, ३ मंडल कृषी अधिकारी आणि १ तालुका कृषी अधिकारी असा मोठा कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. मात्र प्रत्यक्ष नमुना संकलनाची जबाबदारी केवळ एका महिला कर्मचाऱ्यावर असल्याची माहिती समोर आली आहे. गुणवत्ता नियंत्रण विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे तपासणीची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याचे सांगितले जात आहे. याहून गंभीर बाब म्हणजे पंचायत समिती स्तरावरील गुणवत्ता नियंत्रण विभागात अद्याप अधिकृत कर्मचारीच नियुक्त करण्यात आलेला नसल्याने या विभागाकडून आजपर्यंत एकही नमुना तपासणीसाठी पाठविण्यात आलेला नसल्याची माहिती मिळत आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी उभारलेली यंत्रणाच निष्क्रिय ठरत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे. बाजारात नवीन बी-बियाण्यांची आवक होताच त्याची माहिती कृषी विभागाकडे उपलब्ध असते. अशावेळी तत्काळ नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठविणे अपेक्षित असताना त्यात होत असलेल्या विलंबामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. आवश्यक असल्यास मंडल अधिकाऱ्यांच्या मदतीने विशेष मोहीम राबविता येऊ शकते, मात्र त्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली दिसत नाहीत. यापूर्वी तपासणीसाठी पाठविलेल्या नमुन्यांपैकी किती नमुने निकृष्ट अथवा फेल ठरले, याबाबतही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याची तक्रार आहे. अनेक अहवाल अद्याप प्रलंबित असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, बहुतांश शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू केलेल्या असताना नंतर बियाणे निकृष्ट असल्याचे निष्पन्न झाल्यास झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# ज्ञानज्योती पुरस्कार वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा २८ जूनला

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा येथील ज्ञानज्योती फाऊंडेशनच्या वतीने उमरगा व लोहारा तालुक्यातील इयत्ता 10 वी व 12 वी च्या परीक्षेतील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, करीअर मार्गदर्शन मेळावा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना ज्ञानज्योती पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला असून, २८ जून रोजी हा कार्यक्रम होणार आहे.

या सोहळ्याचे यंदा हा १७ वे वर्ष असून, २८ जुन रोजी सकाळी ११.०० वाजता शांताई मंगल कार्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. प्रा. रविंद्र गायकवाड तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ.विजयकुमार फड, (सेवानिवृत्त आय.ए.एस. आणि प्रसिद्ध व्याख्याते) यांची उपस्थिती राहणार आहे. राज्यसभा खासदार डॉ.ज्योती वाघमारे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. माजी आमदार शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्यासह जेष्ठ शिवसेना नेते जितेंद्र शिंदे, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अश्लेष मोरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अभय चालुक्य, नगराध्यक्ष किरण गायकवाड, लोहारा पं.स. सभापती पल्लवी जानकर, उपसभापती अमोल पाटील, लोहारा नगराध्यक्षा वैशाली खराडे, गटशिक्षणधिकारी उमरगा अमोल राजपुत, गटशिक्षणाधिकारी लोहारा शिवकुमार बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोहळ्यासाठी उमरगा व लोहारा तालुक्यातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी व पालकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ज्ञानज्योती फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा उमरगा पंचायत समितीच्या सभापती अ‍ॅड.आकांक्षा ज्ञानराज चौगुले, उपाध्यक्ष विजयकुमार वडदरे व सचिव प्रदीप मदने, कोषाध्यक्ष अमर देशटवार यांनी संचालक मंडळाच्या वतीने केले आहे.




### हे आहेत ज्ञानज्योती फाऊंडेशन पुरस्काराचे मानकरी

**सुनील माने, बेडगा ता.उमरगा - उद्योग व सहकार**
**प्रवीणचंद्र तोतला, रा.उमरगा ता.उमरगा – जेष्ठ विधीज्ञ व सामाजिक कार्यकर्ते**
**शेखर घंटे, रा.नारंगवाडी ता.उमरगा – आदर्श सरपंच**
**रसिका कटकधोंड, रा.केसरजवळगा ता.उमरगा – महिला गृह उद्योजिका**
**गिरीष भगत रा.लोहारा ता.लोहारा – उत्कृष्ट पत्रकार**
**संतोष शिंदे , रा.मुळज ता.उमरगा – कृषी रत्न**

# पोलीस निरीक्षक शकील शेख यांच्या तत्परतेने टळला संभाव्य अपघात

आरंभ मराठी । कळंब

कळंब शहरातील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील मुख्य रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांसमोर अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला होता. ढोकी, केज, येरमाळा तसेच शहरातील सोनार लाईनकडे जाणारा हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. संबंधित प्रशासनाला खड्ड्यांची माहिती असूनही दुरुस्तीची कार्यवाही होत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत होते. भविष्यात या खड्ड्यांमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ पुढाकार घेतला. संबंधित विभागाच्या कार्यवाहीची प्रतीक्षा न करता त्यांनी खाजगी मिक्सर मशीनच्या साहाय्याने रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास वाहतूक कमी असताना रस्त्यावरील तीनही मोठे खड्डे सिमेंट कॉंक्रिटने बुजवून घेतले. पोलीस निरीक्षक शेख यांच्या या तत्पर आणि लोकहिताच्या कृतीमुळे संभाव्य मोठा अपघात टळला असून वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



# पळसप येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात; नवागतांचे स्वागत, पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप

आरंभ मराठी । पळसप



राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवमय साजरा करण्याच्या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा 'शाळा प्रवेशोत्सव' जिल्हा परिषद प्रशाला, पळसप (ता. जि. धाराशिव) येथे १५ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बैलगाडीतून आकर्षक प्रवेश दिंडी काढण्यात आली. शाळेचा पहिला दिवस हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने प्रशालेतील सर्व विद्यार्थी या दिंडीत आनंदाने व उत्साहाने सहभागी झाले होते. कार्यक्रमास डॉ. बिराप्पा शिंदे, उमेश नरवडे (अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव), इंग्रजी अभ्यास मंडळाचे चेअरमन संजय पवार, मुख्याध्यापक पवार पी. एस., सर्व शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानराज सरडे, सूर्यकांत लाकाळ तसेच पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. प्रसंगी अधिव्याख्याता डॉ. बिराप्पा शिंदे आणि उमेश नरवडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यास आणि उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक बाबींविषयी मार्गदर्शन केले.

दैनिक आरंभ मराठी

## अ‍ॅड. व्यंकट गुंड पाटील यांची सहकार मंत्र्यांशी चर्चा

# गुळ पावडर उद्योगाच्या विकासासाठी शासन सकारात्मक

आरंभ मराठी । धाराशिव



इनोव्हेटिव्ह जॅगरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, महाराष्ट्र व कर्नाटक (IJMA) यांच्या वतीने संघटनेचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. व्यंकट गुंड पाटील यांनी महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची लातूर येथे भेट घेऊन गुळ पावडर उद्योगासमोरील विविध समस्या, उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना तसेच शासनाकडून अपेक्षित धोरणात्मक पाठबळ याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी अ‍ॅड. पाटील यांनी गुळ पावडर उद्योगासंदर्भातील एफआरपी (FRP) विषयक मुद्दे, उद्योगाला भेडसावणाऱ्या अडचणी तसेच इथेनॉल निर्मितीसाठी गुळ पावडर कारखान्यांना आवश्यक परवाने देण्याची मागणी सहकार मंत्र्यांकडे आग्रहीपणे मांडली. उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांचे निवेदनही यावेळी सादर करण्यात आले. या बैठकीस आमदार विक्रम काळे, शहाजी पवार, अविनाश महागावकर, साहेबराव पाटील, उद्योजक व्ही. पी. पाटील तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. संघटनेच्या वतीने मांडण्यात आलेल्या मागण्या आणि उद्योगासमोरील अडचणींची सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी गांभीर्याने दखल घेतली. गुळ पावडर उद्योग हा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित महत्त्वाचा उद्योग असून त्याच्या प्रगतीसाठी शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मांडण्यात आलेल्या विषयांवर संबंधित विभागांशी चर्चा करून लवकरच अनुकूल निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# 'स्टॉप डायरिया अभियान' आजपासून; जिल्ह्यातील १.६९ लाख बालकांपर्यंत पोहोचणार आरोग्य विभाग

आरंभ मराठी । धाराशिव

पाच वर्षांखालील बालकांमधील अतिसारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी आणि बालमृत्यूदर कमी करण्यासाठी जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलैदरम्यान 'स्टॉप डायरिया अभियान-२०२६' राबविण्यात येणार आहे. 'अतिसारावर करा मात, स्वच्छता व ओआरएसची घेऊनी साथ' या घोषवाक्याखाली आरोग्य विभागाकडून जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि उपचारांवर विशेष भर दिला जाणार आहे.अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, अंगणवाडी केंद्रे आणि आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जाणार आहे. अतिसार झालेल्या प्रत्येक बालकाला तातडीने ओआरएस द्रावण व झिंक गोळ्या उपलब्ध करून देत पालकांना त्याच्या वापराबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.घरभेटी, ग्रामसभा, शाळा व अंगणवाडी स्तरावरील कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, हात धुण्याचे महत्त्व, स्तनपान आणि पूरक आहाराबाबत नागरिकांचे प्रबोधन करण्यात येणार आहे. अतिसाराची लक्षणे दिसताच जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरदास आणि जिल्हा माता - बाल संगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी यांनी केले आहे.

### अभियान कालावधी

१६ जून ते ३१ जुलै २०२६
लक्षित बालके : १ लाख ६९ हजार ८१२
अभियानासाठी नियुक्त मनुष्यबळ : ५,८१५ आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी

# सुसाट वाऱ्याचा परंडा तालुक्यात तडाखा; केळी बागा व सोलर पॅनलचे मोठे नुकसान





**आरंभ मराठी । जवळा**

परंडा तालुक्यातील जवळा व सिरसाव परिसरात शनिवारी (दि.१३) रात्री झालेल्या सुसाट वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली असून काही झाडे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांवर कोसळल्याच्या घटनाही घडल्या. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळा येथील शेतकरी रणजीत राजेंद्र सांगडे यांच्या शेतातील सुमारे १७०० ते १८०० केळीची झाडे वाऱ्याच्या तडाख्याने जमीनदोस्त झाली. पीक काढणीच्या टप्प्यात असताना झालेल्या या नुकसानीमुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. तसेच सिरसाव येथील शेतकरी सुनील ज्ञानोबा मिसाळ यांच्या शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेल्या सोलर पॅनलचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिसरातील शेतकऱ्यांचे केळी पीक, सोलर पॅनल तसेच इतर शेतीमालाचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामे करावेत आणि शासनाकडून योग्य नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी मागणी केली आहे.

# कोष्टी समाज ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## ४६ हजारांचे शैक्षणिक साहित्य वाटप



**आरंभ मराठी । भूम**

कोष्टी समाज ट्रस्टच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमाअंतर्गत ३८ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला असून त्यांना एकूण ४६ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बागडे होते. यावेळी महावितरणमध्ये आदर्श गुणवंत कामगार म्हणून सन्मानित झालेले जयराज बाबर तसेच विना अपघात सेवा बजावल्याबद्दल सतीश दाते यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला गुरुदेव शाळेचे मुख्याध्यापक भोसले सर, ज्येष्ठ व्यापारी पांडुरंग वरवडे, सुभाष उपरे, प्रगतशील शेतकरी अभिमन्यू नवले, महावितरण अधिकारी गणेश तारळकर, माजी नगरसेविका वारे ताई, मीना बागडे, प्रणिता वरवडे आणि स्वरा सागर बागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजसेवक बी. व्ही. सदानंदे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर संच, पेन, कंपास व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच कै. डॉ. श्रीकांत फलके यांच्या स्मरणार्थ शैलेश फलके यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला रजिस्टर आणि पेनसेट भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन दिले.

# जेसीबीतून पुष्पवृष्टी, वाजतगाजत विद्यार्थ्यांचे स्वागत; मांडवा शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**आरंभ मराठी । वाशी**




तालुक्यातील मांडवा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गावातून वाजतगाजत प्रभातफेरी काढण्यात आली असून विद्यार्थ्यांवर जेसीबीच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करण्यात आली. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा गुलाबपुष्प देऊन साजरा करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचे प्रातिनिधिक वाटप करण्यात आले. कार्यक्रमास पंचायत समिती वाशीचे उपसभापती नितीन रणदिवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान रणदिवे तसेच कृषी विस्तार अधिकारी साळुंखे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक मोहन ठाकूर यांनी शाळेतील आवश्यक भौतिक सुविधांबाबत व शैक्षणिक गुणवत्तेबाबत माहिती दिली. शाळेच्या उर्वरित भौतिक सुविधा लवकरच पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही उपसभापती नितीन रणदिवे यांनी दिली. कृषी विस्तार अधिकारी साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा देत शाळेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी गावातील शिक्षणप्रेमी नागरिक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी. व्ही. कडबने यांनी केले. प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जेकेकूर येथे 'खेत बचाव अभियान' अंतर्गत खरीप जनजागृती

**आरंभ मराठी । नारंगवाडी**




खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा तालुक्यातील जेकेकूर येथे 'खेत बचाव अभियान' अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी सखी तसेच बळीराजा नैसर्गिक शेतकरी गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. भगवान अरबाड यांनी शाश्वत शेती, नैसर्गिक शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, 'खेत बचाव अभियान'ची उद्दिष्टे आणि बदलत्या हवामानातील शेती व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापुरे यांनी यंदाच्या खरीप हंगामात संभाव्य अल निनो परिस्थिती, पावसातील खंड आणि हवामानातील अनिश्चितता लक्षात घेता शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले. बीजप्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता चाचणी, टोकन व रुंद वरंबा-सरी पद्धतीने पेरणी तसेच आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सोयाबीन पेरणीसाठी ७५ ते १०० मि.मी. समाधानकारक पाऊस होऊन जमिनीच्या १५ ते २० सेंटीमीटर खोलीपर्यंत पुरेशी ओल निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी, असेही त्यांनी सांगितले. आत्माचे तालुका तंत्र व्यवस्थापक एम. यू. सय्यद यांनी सोयाबीन बियाण्यांच्या उगवण क्षमता तपासणीचे प्रात्यक्षिक सादर करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष माहिती दिली. उप कृषी अधिकारी एल. व्ही. फडणवीस यांनीही विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. बी. गर्जे पाटील यांनी केले. यावेळी बळीराजा नैसर्गिक शेतकरी गटाचे अध्यक्ष माधव जाधव, सचिव विश्वास बिराजदार, कृषी सखी नीता जाधव, राधिका बिराजदार तसेच रवी पाटील, संतोष समाने, ईश्वर वागले, दादा पटेल, एजाज पठाण, बसवराज जेवळे, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशनकडून कळंब तालुक्यात सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**आरंभ मराठी । कळंब**




नाम फाउंडेशन प्रायोजित व पर्याय फाउंडेशन आयोजित 'बीज महोत्सव' अंतर्गत सोयाबीन बियाणे वाटपाचा उपक्रम शनिवारी (दि.१३) हासेगाव (के.) येथील पर्याय फाउंडेशनच्या कार्यालय परिसरात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला कळंब व वाशी तालुक्यातील महिला शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली. या उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील १५ हजार तर धाराशिव जिल्ह्यातील ५ हजार ५०० अल्पभूधारक व एकल महिला शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात येत आहे. संघर्षमय परिस्थितीतही आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या गरीब, अल्पभूधारक शेतकरी व एकल महिलांच्या पाठीशी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून पर्याय फाउंडेशन खंबीरपणे उभे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र लोकविकास मंचाचे विश्वनाथ तोडकर यांनी केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना तोडकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले नाम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात यांनी संस्थेच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली. अल्पभूधारक शेतकरी आणि एकल महिलांच्या विकासासाठी नाम फाउंडेशन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हवामान तज्ज्ञ पंजाब डक यांनी यंदाचा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त करत मराठवाड्यात चांगल्या पावसाचा अंदाज वर्तविला. शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून खरीप हंगामाची तयारी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास नाम फाउंडेशनचे समन्वयक राजाभाऊ शेळके, धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष महेश पोतदार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्याय फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋषिकेश तोडकर यांनी केले. सूत्रसंचालन विलास गोडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन एकल महिला संघटनेच्या अध्यक्षा सुनंदा खराटे यांनी मानले.

# आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते रामपूर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**उमरगा** :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामपूर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. शाळा परिसर आकर्षक सजावटीने सजविण्यात आला होता. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत दासमे, उपसरपंच अनंत भोसले, विष्णू भोसले, नितीन भोसले, उमेश भोसले यांच्यासह शिक्षणप्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक महादेव शिंदे यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच बूट-स्वॉक्सचे वाटप करण्यात आले. आमदार प्रवीण स्वामी यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. नवागत विद्यार्थ्यांचे आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहशिक्षक धर्मराज भोसले, विकास स्वामी, राजकुमार कोराळे, रत्नमाला सगर आणि विद्यावती कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी धर्मराज भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बिल गेट्स महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**धाराशिव** :- बिल गेट्स महाविद्यालय येथे नुकत्याच जाहीर झालेल्या बीसीएस वर्गाच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यामध्ये कुमारी अंकिता कुदळे हिने बीसीएस वर्गात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच अजय जमाले यांनी तृतीय क्रमांक, तर कुमारी अंजली जगताप हिने चतुर्थ क्रमांक मिळवत महाविद्यालयाच्या यशात भर घातली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेचे सचिव डॉ. रमेश दापके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरशद रजवी तसेच उपप्राचार्य प्रा. कुंभार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. सत्कार समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दैनिक आरंभ मराठी**

## पहिल्याच दिवशी गणवेश, पुस्तके व वह्यांचे वाटप

# आढाळा जि.प. शाळेत नवागतांचे जल्लोषात स्वागत

**आरंभ मराठी । कळंब**




कळंब तालुक्यातील आढाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे आणि नवागतांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. तसेच 'सैनिक हो तुमच्यासाठी – झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश देणाऱ्या माझी सैनिक संघटना, कळंब यांच्या वह्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने शाळेतील शिक्षकांच्या आर्थिक सहकार्यातून सुमारे साडेतीन हजार रुपये किमतीच्या वह्या सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या तसेच नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे फेटे बांधून आणि हार घालून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना जिलेबी व खाऊचे वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी शाळेच्या ग्रंथालयासाठी दहा पुस्तकांची भेट दिली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष लोकप्रिय असलेल्या पुस्तकाची प्रतही ग्रंथालयासाठी प्रदान केली. याच कार्यक्रमात विद्यार्थिनी ईश्वरी कालिदास वायसे हिचा वाढदिवस शाळेच्या वतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून तिनेही ग्रंथालयासाठी दहा पुस्तके भेट देत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले. कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा व सदस्यांसह गावातील शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहशिक्षक तुकाराम कराळे यांनी केलेले आकर्षक फलकलेखन आणि सहशिक्षिका शिवानंद स्वामी यांनी रेखाटलेली सुंदर रांगोळी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक महादेव खराटे यांनी तर आभार प्रदर्शन सहशिक्षक बलभीम राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वयंसेवक बापू हगारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# येणेगूरमध्ये शैक्षणिक वर्षाचे उत्साहात स्वागत; विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

**आरंभ मराठी । येणेगूर**



उमरगा तालुक्यातील येणेगूर येथे सोमवारी (दि.१५) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवसाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. कॅप्टन जोशी स्मारक विद्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री परमहंस शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव तथा कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयाचे संस्थापक कै. बाबुराव (बी. ए.) बिराजदार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातून जनजागृती रॅली काढून शिक्षणाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविले. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम श्री परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, मुख्याध्यापक महेश हरके, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अप्पू हिप्परगे, पालक प्रतिनिधी दत्तात्रेय धामशेट्टी, नागनाथ परभळकर, महिला पालक प्रतिनिधी राजश्री गुंजोटे, संचालक शंकर हुळमजगे आणि आनंदराज बिराजदार यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्कृती विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. यावेळी शिक्षक सौरभ उटगे, महेश खंडाळकर, अविनाश दुनगे, व्यंकट बिराजदार, प्रवीण स्वामी, चंद्रकांत बिराजदार, गोविंद मेडेबणे, कोमल कीर्तने, पार्वती जगताप, कालिंदी भाले, प्रदीप शिंदे, सुरेश जाधव, तानाजी मदने, अप्पू मुदकण्णा, सुप्रिया झिंगाडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.